मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2023-03-25 | Page- 2
epaper.mahamtb.con

# २ दिवसीय सामरिक संवाद परिषद

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ: चीनचा उदय, जागतिक परिणाम

**पुणे, दि. २४ : प्रतिनिधी**

'चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम' विषयावर दुसऱ्या सामरिक संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग व दिल्ली येथील 'सेंटर फॉर चायना ॲनालिसिस ॲण्ड स्ट्रॅटेजी' यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद २७ व २८ मार्च रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात होईल.

या परिषदेच्या उद्घाटन सत्राची सुरुवात भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या बीजभाषणाने होणार आहे. सोमवार, दि. २७ मार्च रोजी दुपारी ४ वाजता होणाऱ्या या सत्रात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र– कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.



नितीन करमळकर, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, 'सेंटर फॉर चायना ॲनालिसिस ॲण्ड स्ट्रॅटेजी'चे अध्यक्ष जयदेव रानडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, असे डॉ. विजय खरे यांनी सांगितले.

दुसऱ्या सत्रात चीनचा धोरणात्मक अजेंडा व चीनचे राष्ट्रपती शी शिंगपिंग यांच्या वाढत्या जागतिक महत्त्वाकांक्षा व त्यांचे सामरिक हेतू समजण्याकरिता त्यांचे व्यक्तिमत्त्व समजणे गरजेचे आहे. या सत्रात चीनमधील भारताचे माजी राजदूत गौतम बंबावले, गुजरातच्या महाराज सयाजीराव गायकवाड विद्यापीठातील प्रा. दिलीप मोहिते प्राध्यापक डॉ. श्रीकांत परांजपे, विचार मांडणार आहेत.

तिसऱ्या सत्रात चीनची तैवानवरील भूमिका व दक्षिण चीन सागरातील चीनच्या आक्रमिक भौगोलिक विस्तारासाठी सुरू असलेल्या हालचाली व त्याला आटोक्यात आणण्यासाठी विविध समविचारी देशांमार्फत आखल्या जाणाऱ्या योजना व धोरणावर तर, चौथ्या व शेवटच्या सत्रात भारतात वैचारिक प्रभाव प्रस्थापित करण्याकरिता चीनद्वारे अनेक स्थरांवरती प्रयत्न केले जातात. प्रसार माध्यमे व सामाजिक माध्यमांद्वारे भारतापेक्षा चीन कशाप्रकारे श्रेष्ठ आहे हे व असे अनेक पैलू रुजवण्याकरिता प्रयत्न होतात या विषयावर विविध मान्यवर मार्गदर्शन करतील.

Powered by iDocuments

वर्ष : १४३

Regd.No. PCW/002/2021-2023-S.P.College Post-RNI No. 1755/1957

केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ८३ ● पृष्ठे : ८+रविवार पुरवणी ● सहा रुपये ● रविवार २६ मार्च २०२३, पुणे C (पुणे/अहमदनगर/सोलापूर आवृत्ती)

# 'चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम' विषयावर परिषद

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग व दिल्ली येथील सेंटर फॉर चायना अनालिसिस अँड स्ट्रॅटेजी यांच्या वतीने 'चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम' या विषयावर दुसऱ्या सामरिक संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद २७ व २८ मार्च रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे.

याविषयी अधिक माहिती देताना संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.विजय खरे यांनी सांगितले की, परिषदेच्या उद्‌घाटन सत्राची सुरुवात भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या बीजभाषणाने होणार आहे. २७ मार्च दुपारी ४ वाजता होणाऱ्या या सत्रात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र–कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, सेंटर फॉर चायना ॲनालिसिस अँड स्ट्रॅटेजीचे अध्यक्ष जयदेव रानडे, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

२८ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता परिषदेच्या दुसऱ्या सत्रात चीनचा धोरणात्मक अजेंडा व चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्या वाढत्या जागतिक महत्त्वाकांक्षा व त्यांचे सामरिक हेतू समजण्याकरिता त्यांचे व्यक्तिमत्त्व समजणे गरजेचे आहे व ते समजण्याकरिता त्यांच्या जडण घडणीतून त्यांच्या ध्येय निश्चितेचा अंदाज आपणास येतो व त्यानुसार आपल्या राजकीय धोरणात काय बदल करावा हे समजते. या विषयावर या सत्रात चीनमधील भारताचे माजी राजदूत गौतम बंबावले, गुजरातच्या महाराज सयाजीराव गायकवाड विद्यापीठातील प्रा. दिलीप मोहिते, प्राध्यापक डॉ. श्रीकांत परांजपे, प्राध्यापक डॉ. विजय खरे व सेंटर फॉर चीन ॲनालायसिस अँड स्ट्रॅटेजीचे जयदेव रानडे, आदी यावेळी विचार मांडणार आहेत.

नवराष्ट्र

# पुणे विद्यापीठात चीनविषयक परिषद

## लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते उद्घाटन



**पुणे,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, दिल्ली येथील सेंटर फॉर चायना अनालिसिस अँड स्ट्रॅटेजी यांच्यातर्फे चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम या विषयावर सामरिक संवाद परिषद आयोजित करण्यात आली आहे. २७ आणि २८ मार्चला विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते सोमवारी होणार आहे.संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांनी ही माहिती दिली.

यंदा या परिषदेचे दुसरे वर्ष आहे. चीनच्या जागतिक स्तरावरील वाढत्या विस्तारामुळे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अशा परिणामांचे मंथन या परिषदेत होईल. उद्घाटनाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, सेंटर फॉर चायना अनालिसिस अँड स्ट्रॅटेजीचे अध्यक्ष जयदेव रानडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### २७ आणि २८ मार्चला परिषदेचे आयोजन

माजी राजदूत गौतम बंबावले, प्रा. दिलीप मोहिते, डॉ. श्रीकांत परांजपे, एअर मार्शल भूषण गोखले, अमेरिकन दूतावासाचे जिम विल्सन, टोकियो येथील इंडो पॅसिफिक स्ट्रॅटेजिक स्टडीज केंद्राचे डॉ. अकिमोटोदैसुके, प्रा. रॉजर लिऊ, एअर मार्शल एस. एस. सोमण, डॉ. अरविंद कुमार, शेषाद्री चारी, नेपाळचे माजी राजदूत विजय कांत कारणा, सेंटर फॉर चायना अनालिसिसचे नम्रता हासिजा, डॉ. अरूण दळवी, लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस आदी मान्यवर परिषदेतील विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत.

Pune Edition
27 March 2023 Page No. 6
epaper.navarashtra.com

नवभारत

# पुणे यूनिवर्सिटी में 2 दिवसीय चीन संबंधी परिषद आज से

**पुणे.** नवभारत न्यूज नेटवर्क. सावित्रीबाई फुले पुणे यूनिवर्सिटी के रक्षा और सामरिक शास्त्र विभाग, दिल्ली के सेंटर फॉर चायना अनालिसिस एंड स्ट्रैटजी की तरफ से चीन के उदय और उसके वैश्विक परिणाम विषय पर सामरिक संवाद परिषद आयोजित किया गया है. 27 और 28 मार्च को यूनिवर्सिटी के संत ज्ञानेश्वर सभागृह में होने वाले इस परिषद का उद्घाटन सेना प्रमुख जनरल मनोज पांडे के हाथों सोमवार 27 मार्च को होगा. इसकी जानकारी रक्षा और सामरिक शास्त्र विभाग के प्रमुख डॉ. विजय खरे ने दी.



## परिषद का यह दूसरा वर्ष

चीन के वैश्विक स्तर के बढ़ते विस्तार के कारण राजनीतिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रों पर होने वाले परिणाम पर इस परिषद में मंथन किया जाएगा. इस परिषद में पूर्व राजदूत गौतम बंबावले, प्रा. दिलीप मोहिते, डॉ. श्रीकांत परांजपे, एयर मार्शल भूषण गोखले, प्रा. रॉजर लिऊ,अमेरिकन दूतावास के जिम विल्सन, टोकियो के इंडो पैसिफिक स्ट्रैटजिक स्टडीज केंद्र के डॉ. अकिमोटोदैसुके, एयर मार्शल एस एस सोमण, डॉ. अरविंद कुमार, शेषाद्री चारी, नेपाल के पूर्व राजदूत विजय कांत कारणा, सेंटर फॉर चायना अनालिसिस की नम्रता हासिजा, डॉ. दलवी, लेफ्टिनेंट जनरल सुदर्शन हसबनीस आदि मार्गदर्शन करेंगे.

THE TIMES OF INDIA, PUNE
TUESDAY, MARCH 28, 2023

# 'Army firm & resolute in dealing with LAC tension'

Sandip.Dighe@timesgroup.com

**Pune:** Chief of Army Staff (COAS) General Manoj Pande on Monday said China's transgressions across the LAC continue to remain a potential trigger for heightened Sino-Indian tensions.

General Pande was speaking at the second strategic dialogue on 'Rise of China and its implication for the world' at the Savitribai Phule Pune University. The event was jointly organised by SPPU's department of defence and strategic studies (DSSS) and the Centre for China Analysis and Strategy, New Delhi. General Pande said that the Indian army was firm and resolute in dealing with the Chinese aggression.

"We have agreements and protocols of 1993, 1996, 2005 and 2013 in order to maintain peace and tranquillity at LAC. However, concerns still remain about transgressions carried out by the Chinese army along the Line of Actual Control, which violates these agreements," General Pande said and added that border management requires close monitoring as infirmities may leader to a larger conflict.

The army chief was of the opinion that bilateral relations with China are entwined with the border issue and said that external affairs minister S Jaishankar's statements aptly reflect the situation. The minister had earlier said that India-China ties could return on a positive trajectory and remain sustainable only if they based on the principles of mutual sensitivity, respect and interest.

On the engagement mechanisms with China, General Pande said that the current political, diplomatic and military channels are being utilised optimally to ensure stability along the LAC. "Talks (between India and China) are continuing under these established mechanisms," he added.

Observing that Beijing has significantly accrued capabilities for mobilisation and sustenance of military forces and operations by construction of roads, airfields, helipads, etc along the LAC, the COAS said, "India has the adequate reserves and is prepared to deal with any contingency."

General Pande said that unresolved border disputes — territorial as well as maritime, — illegal cross-border migration, non-traditional threats, such as illegal and unregulated fishing and increasing religious fundamentalism coupled with regional vulnerability to climate change-induced disaster are going to keep South Asia region in flux.

On China's geo-strategic approach, General Pande said that Beijing is increasingly displaying willingness to project its military power from its aggressive attempts in establishing bases in the Indo-Pacific, Africa and more importantly in our immediate neighbourhood.

The army chief said Beijing was trying to replace the US as the global net security provider and this was evident in the Saudi-Iran peace deal which was brokered by China and also in the peace plan proposed to resolve the Russia-Ukraine conflict, which according to him, had only added to the turbulence in the landscape of global geo-security calculus.




Chief of Army Staff General Manoj Pande at the second strategic dialogue held on the SPPU campus on Monday evening

WWW.INDIANEXPRESS.COM
THE INDIAN EXPRESS, TUESDAY, MARCH 28, 2023

# Army chief: China using weaponisation of supply chain to expand its influence

SUSHANT KULKARNI
PUNE, MARCH 27

CHIEF OF Army Staff General Manoj Pande on Monday said 'China is using predatory economics and weaponisation of supply chains to expand its sphere of influence'. He also said obfuscation of reality and exploiting cyber and information operations are some of the common tools in the Chinese playbook.

The Army chief on Monday delivered the keynote address at the two-day strategic dialogue being held in Pune on the subject 'Rise of China and Its Implications for the World.' The two-day conference has been jointly organised by the New Delhi-based Centre for China Analysis and Strategy and the Department of Defence and Strategic Studies (DDSS) of the Savitribai Phule Pune University (SPPU). The conference has sessions on subjects including China's strategic agenda, the crisis in South China Sea and Taiwan and China's influence operations in India.

In his address, speaking about the markers of the rise of China, Gen Pande said, "China's rise as a political, technological and military power has accorded it a new hierarchical position in the world order, which it intends to lead. China's strides as a political powerhouse are evident in its pursuit for a much larger seat at the high table. Brokering of peace talks between Saudi Arabia and Iran and putting forth the Chinese 12-point peace plan for ending the ongoing Russia Ukraine conflict is reflective of a Chinese urgency to replace the US as the global net security provider. Today China stands as the largest economy in purchasing power parity terms. On one hand, it is building an international network of coercion through predatory economics while on the other it claims pulling out more than 100 million of its own people out of poverty. Its pursuit to expand the sphere of influence through economic maneuvering, weaponisation of resource supply chains, financing large infrastructure projects with scant regard for environmental and safety standards and straddling recipient countries with unsustainable debt, are there for the world to see."

Speaking about China's military rise and increasing use of Artificial Intelligence, Gen Pande made reference to China's 2019 Defence White Paper, which propagated fighting and winning intelligentised wars. "It is also prudent to recognise China's grey zone actions which involve kinetic and non-kinetic forms of assertiveness and coercion, aimed at achieving strategic goals without provoking a conflict. Selective historical referencing, intelligent obfuscation of reality using legal framework and exploiting technological prowess in cyber and information operations are some of the common tools in the Chinese playbook," the Army chief said.

Speaking about the current situation in the context of China, Gen Pane said, "The most important aspect remains our legacy challenges of our unsettled and disputed borders. Pockets of disputes and contested claims to territories continue to exist due to differing perceptions of the alignment of the line of actual control. Transgressions remain a potential trigger for escalation. As you all know, we have agreements and protocols from 1993, 1996, 2005 and 2013 in the military domain to maintain peace and tranquillity on the LAC. Concerns remain over the violation of these by China with their attempt to carry out transgressions across the LAC. The boundary issues cannot be divorced from bilateral relations."

He added, "Indian Army's strategic orientation and long-term capability development has been with the focus on the northern borders. We have adequate reserves and are prepared to deal with any contingency. Our preparedness remains of a high order and troops continue to deal with the PLA in a firm, resolute and measured manner while ensuring the sanctity of claims."

लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM
पुणे, मंगळवार, २८ मार्च २०२३

# चीनकडून प्रत्यक्ष ताबा रेषेचे सातत्याने उल्लंघन हे संभाव्य वादाचे कारण

## लष्करप्रमुख मनोज पांडे यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : प्रत्यक्ष ताबा रेषेचे चीनकडून सातत्याने केले जाणारे उल्लंघन हे संभाव्य वादाचे कारण ठरू शकते. मात्र भारतीय सैन्य चीनच्या सैन्याचा सामना करण्यासाठी सक्षम आहे, असे प्रतिपादन लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी सोमवारी केले. संवेदनशीलता, आदर आणि स्वारस्य या तीन घटकांवरच भारत आणि चीन संबंधातील सकारात्मकता, सावधता, सीमेवरील स्थिती अवलंबून राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सामरिक आणि संरक्षणशास्त्र विभाग, सेंटर फॉर चायना ॲनालिसिस अँड स्ट्रॅटेजी यांच्यातर्फे आयोजित 'राइज ऑफ चायना अँड इट्स इम्प्लिकेशन्स फॉर द वर्ल्ड' या विषयावरील परिषदेचे उद्घाटन जनरल पांडे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्रकुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, सेंटर फॉर चायना ॲनालिसिस अँड स्ट्रॅटेजीचे अध्यक्ष जयदेव रानडे या वेळी उपस्थित होते.

पांडे म्हणाले, की इंडो-पॅसिफिक भागात आणि आफ्रिकेमध्ये लष्करी तळ स्थापन करण्याच्या आक्रमक प्रयत्नातून चीन लष्करी शक्ती दाखवण्यासाठी प्रयत्नशील आहे. चीनच्या नौदलाचा वेगाने होणारा विस्तार हे त्याच्या अतिरिक्त प्रादेशिक सामर्थ्याचे उदाहरण आहे. चीनकडून लष्करी शस्त्रे, उपकरणे आणि तंत्रज्ञानाचा प्रसार वाढवला जाणे दक्षिण आशियासाठी चिंताजनक आहे. चीनने रस्ते, विमानतळ, हेलिपॅड्स बांधून सैन्याची जमवाजमव, वापर आणि लष्करी कारवाई टिकवून ठेवण्याची लक्षणीय क्षमता निर्माण केली आहे. वाद मिटवण्यासाठी आणि भूभाग परत मिळवण्यासाठी चीनने लष्करी शक्तीचा वापर केल्याने जागतिक सुरक्षेबाबत गंभीर परिणाम होतो, असे ते म्हणाले.

राजकीय, मुत्सद्दी आणि लष्करी स्तरावर यंत्रणा अस्तित्वात आहेत. त्यांचा प्रत्यक्ष ताबारेषेवर स्थैर्य राखण्यासाठी चांगल्या प्रकारे वापर करता येतो. सीमाभागात दळणवळण अधिक सोयीचे होण्यासाठी सैन्याने रस्ते पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न वाढवले आहेत. तसेच पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी सीमाभागात विविध संस्थांबरोबर कार्यरत आहे. उत्तर सीमेवरील सामरिक व्यूहरचना आणि दीर्घकालीन क्षमता विकासावर भारतीय लष्कराचा भर आहे. जागतिक स्तरावर एक महत्त्वाचा देश म्हणून भारत उदयास आला आहे. वाढती अर्थव्यवस्था, तांत्रिक प्रगती आणि इतर राष्ट्रांसोबतच्या धोरणात्मक भागीदारीमुळे भारत आता जागतिक दक्षिणेचा आवाज आहे. सीमा व्यवस्थापनासाठी सखोल देखरेख आवश्यक आहे. भारताकडे साधनसुविधांचा पुरेसा साठा असून, त्याचा कोणत्याही आकस्मिक परिस्थितीत वापर करता येऊ शकतो, असे पांडे यांनी नमूद केले.



### नौदलातर्फे विद्यापीठात लवकरच ॲडमिरल नाडकर्णी अध्यासन

विद्यापीठात संरक्षण मंत्रालय आणि हवाई दलाचे अध्यासन स्थापन झाले आहे. त्याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासनही आहे. आता नौदलातर्फे ॲडमिरल नाडकर्णी अध्यासन स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी नौदलाकडून दोन कोटींचा निधी दिला जाणार असल्याची माहिती डॉ. खरे यांनी दिली.

लोकमत

# चीनविरोधात भारतीय लष्कराने उत्तरेकडील सीमांवर केले लक्ष केंद्रीत

## चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल मनोज पांडे : पुणे विद्यापीठात परिसंवादाचे उद्‌घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** उत्तरेकडील सीमेच्या संरक्षणावर लक्ष केंद्रित केले असून, भारतानेही आपली संरक्षणसिद्धता मजबूत केली आहे. चीनने काही आगळीक केली तर त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी आपले सैन्य सक्षम असल्याचे चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल मनोज पांडे यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ डिफेन्स अँन्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज आणि नवी दिल्लीतील सेंटर फॉर चायना अॅनालेसिस अॅन्ड स्ट्रॅटर्जी यांच्या वतीने 'चीनचा उदय आणि जगावरील परिणाम' या विषयावर दोन दिवसीय परिसंवादाचे उद्घाटन जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते झाले. यावेळी जयदेव रानडे, कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, डॉ. विजय खरे उपस्थित होते.



चीफ ऑफ आर्मी स्टाफ जनरल मनोज पांडे यांचा सत्कार करताना कुलगुरु डॉ. कारभारी काळे. यावेळी डावीकडून डॉ. विजय खरे, जयदेव रानडे, चीफ ऑफ आर्मी स्टाफ, कुलगुरु, प्र-कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे आदी.

पांडे म्हणाले, चीनने हद्दीवर लष्कराची जमवाजमव केली आहे. तसेच रस्ते, हवाई दल, हेलिपॅड आदी लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचा विकास केला आहे. त्याविरोधात भारतीय लष्कराने उत्तरेकडील सीमांवर लक्ष केंद्रित केले आहे. तसेच धोरणात्मक विकासावर भर दिला आहे. चीन निर्मिती आणि सेवा क्षेत्रातील महासत्ता झाली असून, लष्करी ताकदही वाढविली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारताच्या सैन्यदलातही तंत्रज्ञानाचा वापरही वापर वाढला आहे. अग्निवीर भरतीमध्ये भारत चांगली प्रगती करीत आहे.

रानडे म्हणाले, चीन काय विचार करीत आहे? आणि त्याचे भविष्यातील प्लॅन्स काय? ते समजून घेण्यासाठी तरुणांमध्येच नाही तर नागरिकांमध्ये जनजागृतीची गरज आहे.

### संशोधनावर चीनचा भर

चीन आर्थिक, तांत्रिक विकासासह संरक्षण सिद्धता वाढवत आहे. डिफेन्स, स्पेस, आर्टिफिशयल इंटिलन्स, बायोटेक्नॉलॉजी, एनर्जी, हायपर सॉनिक सिस्टिम, क्वांटम तंत्रज्ञान, ६-जी संशोधनावर भर देत आहेत. जगातील टॉपच्या दहा संशोधन संस्था चीनमध्ये असून, पेटंट रजिस्टर करण्यात जगात अग्रेसर आहे.

### परिसंवादात या विषयावर होणार चर्चा

विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात आज 'चायनाज स्ट्रॅटर्जीक अजेंडा', 'क्रायसीस इन साउथ चायना सी अॅन्ड तैवान' आणि 'चायनाज इन्फ्ल्युयन्स ऑपरेशन इन इंडिया' या विषयावर संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ अभ्यासक आणि सैन्य दलातील निवृत्त अधिकारी विचार व्यक्त करणार आहेत.

Pune Main
Page No. 2 Mar 28, 2023
Powered by: erelego.com

# चीनशी सामना करण्यास लष्कर सक्षम : लष्करप्रमुख पांडे

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २७** - देशाचे राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य असेल. प्रत्यक्ष ताबा रेषेचे चीनकडून सातत्याने केले जाणारे उल्लंघन हे संभाव्य वादाचे कारण ठरू शकते. मात्र भारतीय लष्कर चीनच्या सैन्याचा सामना करण्यासाठी सक्षम आहे, असे स्पष्टीकरण लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी आज येथे दिले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सामरिक आणि संरक्षणशास्त्र विभाग, सेंटर फॉर चायना अॅनॅलिसिस अँड स्ट्रॅटेजी यांच्यातर्फे आयोजित 'चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम' या विषयावरील परिषदेचे उद्‌घाटन जनरल पांडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, सेंटर फॉर चायना अॅनॉलिसिस अँड स्ट्रॅटेजीचे अध्यक्ष जयदेव रानडे या वेळी उपस्थित होते.

चीनकडून लष्करी शस्त्रे, उपकरणे आणि तंत्रज्ञानाचा प्रसार वाढवला जाणे दक्षिण आशियासाठी चिंताजनक आहे. चीनने रस्ते, विमानतळ, हेलिपॅड्स बांधून सैन्यांची जमवाजमव, वापर आणि लष्करी कार्यवाही टिकवून ठेवण्याची लक्षणीय क्षमता निर्माण केली आहे. वाद मिटवण्यासाठी आणि भूभाग परत मिळवण्यासाठी चीनने लष्करी शक्तीचा वापर केल्याने जागतिक सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतो, असे ते म्हणाले.

पांडे म्हणाले, की देशाचा प्रभाव वाढायला लागला की तशी नवनवी आव्हाने पुढे यायला लागतात. त्यावर काही जण प्रश्नचिन्ह निर्माण करतील आणि काही जण विरोधही करतील. मात्र एक देश म्हणून आपले राष्ट्रीय हितांना सर्वाधिक प्राधान्य असायला हवी. त्यादृष्टीने आपण काळजी घेतली पाहिजे. भारतीय सैन्य सुप्रशिक्षित, सुसज्ज, लढाई कठोर आणि तयार आहे. कोणत्याही सुरक्षा धोक्याचा किंवा आव्हानाचा सामना करण्यासाठी भारतीय लष्कर सज्ज असल्याचे पांडे यांनी म्हटले.

प्रभात
PuneCity, 28 Mar 2023, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2023-03-30 | Page- 2
epaper.mahamtb.con

# भारताने आपला स्वतंत्र मार्ग निवडावा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ: चीनविषयक धोरणात्मक संवाद परिषदेत तज्ज्ञांचा सुर

**पुणे, दि. २९ : प्रतिनिधी**

दुसऱ्या महायुद्धनंतर ज्याप्रकारे अमेरिकेने जागतिक नेतृत्व करण्यासाठी प्रयत्न केले तसेच प्रयत्न हे सध्या चीनकडून केले जात आहेत. तरी भारताने या दोन्ही देशांच्या पावलावर पाऊल न ठेवता आपला स्वतंत्र धोरणात्मक मार्ग निवडावा असा सूर दोन दिवसीय 'चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम' या धोरणात्मक संवाद परिषदेत उमटला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ही परिषद २७ व २८ मार्चमध्ये संपन्न झाली. उद्घाटन लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे



यांच्या उपस्थितीत झाले. कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह या विषयातील २० हून अधिक तज्ज्ञ मंडळी सहभागी झाली होती. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात चीनचे धोरण, चीनची तैवान वरील भूमिका व दक्षिण चीन सागरातील चीनच्या भौगोलिक विस्तारासाठी सुरू असलेल्या हालचाली, भारतावर वैचारिक प्रभाव प्रस्थापित करण्यासाठी चीनचे प्रयत्न आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महासत्ता होण्यासाठी चीनकडून होणारे प्रयत्नात नावीन्य नाही हीच त्यांची कमकुवत बाब आहे. भारताने आपल्या अर्थव्यवस्था मजबूत करत आपला जागतिक स्थान प्रस्थापित करावे. यासाठी नवे मार्ग निवडण्याची गरज असल्याची चर्चा यावेळी करण्यात आली. बॉलिवूड आणि समाजमाध्यमे, वृत्तपत्रे आदींमध्ये चीनकडून विचारांचा प्रभाव कशाप्रकारे पडला जात आहे हेदेखील उदाहरणासहित स्पष्ट करण्यात आले. या दोन दिवसीय धोरणात्मक संवाद परिषदेचे अभ्यासपूर्ण अहवालात रुपांतर करत केंद्र सरकारला सादर करण्याची शिफारसदेखील यावेळी उपस्थितानी केली.

हा संवाद घेण्यामागे चीनचे धोरण अधिक व्यापकतेने समजून घेणे आणि त्याबाबत केवळ अभ्यासक व विद्यार्थी नाही, तर सर्वांना जागरूक करणे हा हेतू असल्याचे 'सेंटर फॉर चायना अनालीसिस अ‍ॅण्ड स्ट्रॅटेजी'चे अध्यक्ष डॉ. जयदेव रानडे यांनी सांगितले.

नवराष्ट्र

**भूमिका** • सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील चीनविषयक धोरणात्मक संवाद परिषदेत तज्ज्ञांचा सूर

# भारताने आपला स्वतंत्र धोरणात्मक मार्ग निवडावा

**पुणे,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. दुसऱ्या महायुद्धनंतर ज्याप्रकारे अमेरिकेने जागतिक नेतृत्व करण्यासाठी प्रयत्न केले तसेच प्रयत्न हे सध्या चीनकडून केले जात आहेत. जागतिक महासत्ता होण्यासाठीचे चीनचे हे प्रयत्न सुरू असेल तरी भारताने या दोन्ही देशांच्या पावलावर पाऊल न ठेवता आपला स्वतंत्र धोरणात्मक मार्ग निवडावा असा सूर दोन दिवसीय 'चीनचा उदय आणि त्याचे जागतिक परिणाम' या धोरणात्मक संवाद परिषदेत उमटला.

-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ही परिषद २७ व २८ मार्च मध्ये संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या उपस्थितीत झाले. यामध्ये कुलगुरू डॉ.कारभारी काळे, प्र- कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार यांच्यासह या विषयातील २० हून अधिक तज्ज्ञ मंडळी सहभागी झाली होती.



दुसऱ्या दिवशीच्या सत्रात चीनचे धोरण, चीनची तैवान वरील भूमिका व दक्षिण चीन सागरातील चीनच्या भौगोलिक विस्तारासाठी सुरू असलेल्या हालचाली, भारतावर वैचारिक प्रभाव प्रस्थापित करण्यासाठी चीनचे प्रयत्न आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या परिषदेत विषयातील अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्ती सहभागी झाले होते.

### केंद्र सरकारला अहवाल सादर करण्याची शिफारस

महासत्ता होण्यासाठी चीनकडून होणारे प्रयत्नात नाविन्य नाही हीच त्यांची कमकुवत बाब आहे. भारताने आपल्या अर्थव्यवस्था मजबूत करत आपला जागतिक स्थान प्रस्थापित करावे. यासाठी नवे मार्ग निवडण्याची गरज असल्याची चर्चा यावेळी करण्यात आली. बॉलिवूड आणि समाजमाध्यमे, वृत्तपत्रे आदींमध्ये चीनकडून विचारांचा प्रभाव कशा प्रकारे पडला जात आहे हे देखील उदाहरणासहित स्पष्ट करण्यात आले. या दोन दिवसीय धोरणात्मक संवाद परिषदेचे अभ्यासपूर्ण अहवालात रुपांतर करत केंद्र सरकारला सादर करण्याची शिफारस देखील यावेळी उपस्थितांनी केली.

### विद्यार्थी सहभागी

-हा संवाद घेण्यामागे चीनचे धोरण अधिक व्यापकतेने समजून घेणे आणि त्याबाबत केवळ अभ्यासक व विद्यार्थी नाही तर सर्वांना जागरूक करणे हा हेतू असल्याचे सेंटर फॉर चायना अनालीसिस अँड स्ट्रॅटेजीचे अध्यक्ष डॉ. जयदेव रानडे यांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.विजय खरे यांनी सर्वांचे आभार मानले. ही दोन दिवसीय परिषद महाविद्यालयातील दोन लाख विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्वरूपात सहभागी होण्यासाठी उपलब्ध करून दिली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. पुढील वर्षी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिरकाव, चीनकडून तंत्रज्ञानाचा होणारा वापर आदी विषय देखील चर्चेसाठी घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवत त्यांच्यासाठी या विषयावरील निबंध स्पर्धा आयोजित केल्या जाणार असल्याचेही खरे यांनी सांगितले.

Pune Edition
30 March 2023 Page No. 6
epaper.navarashtra.com